माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : २५६७/२०२४**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. अनमोल गोपीचंद कावळे, मु.पो. नेरला, ता. पवनी, जि. भंडारा-४४१९०३ | सचिव, ग्राम पंचायत, तारोली, पो. फेगड, ता. कुही, जि. नागपूर | विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, कुही, ता. कुही, जि. नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १५.०६.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०३.१०.२०२४

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.१०.२०२४

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती अप्राप्त, कालमर्यादेत सुनावणी घेण्यात आली नाही

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जोडपत्र-अ नुसार माहिती लोगो प्रमाणित करुन देण्यात यावी. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर शास्ती व शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०४.०६.२०२४

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १९.०६.२०२४

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०२० ते २०२४ पर्यंत

(४)जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : “ ग्रामपंचायत कार्यालय तारोली पो. फेगड, ता. कुही, जि. नागपूर आपल्या ग्रामपंचायतचे जल जिवन मिशन योजनेसाठी तयार केलेल्या अंदाज पत्रकाची प्रत, प्रत्यक्ष एकूण आलेला निधी, झालेला खर्च, नोंदणी क्र. ठेकेदाराचे नाव, वर्क ऑर्डर प्रत, प्रशासकीय मान्यता प्रत, तांत्रीक मान्यता प्रत, कार्यारंभ आदेश प्रत, निवीदा प्रत, साहीत्य खरेदीसाठी विक्रेत्याकडून मागविण्यात आलेले दरपत्रकांची प्रत, प्रत्यक्ष वारलेल्या साहित्यांची बिले पावत्या, काम सुरु होण्यापूर्वीचे, काम चालू असतांना आणि कामपूर्ण झाल्यानंतर चे फोटो, MB प्रत, तसेच

जल जिवन मिशन योजनेंअतर्गत नळ कनेक्शन जोडणीसाठी लागणाऱ्या साहित्य खरेदीसाठी विक्रेत्याकडून मागविण्यात अलेल्या दरपत्रकाची प्रत, प्रत्यक्ष वापरण्यात आलेल्या साहीत्य बिले, पावत्या तसेच नळ कनेक्शन धारकांची यादी, तसेच खाजगी बिले, पावत्या तसेच नळ कनेक्शन धारकाची यादी तसेच खाजगी नळ कनेक्शन धारकाची यादी, तसेच जल जिवन मिशन योजना राबवण्यासाठी करण्यात आलेल्या संपूर्ण पत्रव्यवहाराची प्रत व त्या पत्रव्यवहारासंबंधी नोंदी असलेल्या आवक-जावक नोंदवहीच्या प्रती " इत्यादी माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १८.०७.२०२४
(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २२.०७.२०२४
(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती अप्राप्त
(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १८.०७.२०२४ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १०.०९.२०२४ रोजी सुनावणी घेवून "(अ) अपिलकर्ता यांचे अपील मान्य करण्यात आले. (ब) जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत तारोली यांनी माहितीचे अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपिलकर्त्याने मागितलेली माहिती व ग्रामपंचायतीला उपलब्ध असलेली माहिती जोडपत्र-अ प्रमाणे रजिस्टर पोस्टाद्वारे विनामुल्य देण्यात यावी" असे नमूद करुन आदेश पारीत केले.

५. **युक्तीवाद/लेखी खुलासा** — आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम पंचायत, तारोली, श्री. रामचंद्र बोरसरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कुही, श्री. पि. एच. बाभिरकर यांनी स्पष्ट केले की, अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही ग्रामपंचायत तारोली येथे उपलब्ध नसल्याने ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, पंचायत समिती, कुही या विभागाला कलम ६(३) नुसार अपिलार्थी यांचा माहिती अर्ज हस्तांतरीत करण्यात आला. त्यानुसार जन माहिती अधिकारी, जि. प. ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, कुही यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थीस दिनांक ३०.०९.२०२४ रोजी स्पीड पोस्टाद्वारे माहिती पाठविलेली आहे व त्याची पोच आयोगास सादर केलेली आहे.

६. **निष्कर्ष :—** अपिलार्थी, श्री. अनमोल गोपीचंद कावळे यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, तारोली, पो. फेगड, ता. कुही, जि. नागपूर यांच्याकडे दिनांक ०४.०६.२०२४ रोजी माहितीसाठी अर्ज केला होता. त्यांच्या या अर्जात नमूद केलेली माहिती ही ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, पंचायत समिती, कुही या विभागाशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, तारोली, पो. फेगड, ता. कुही, जि. नागपूर यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला व त्यानुसार जन माहिती अधिकारी, जि. प. ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, कुही यांच्याकडून अपिलार्थीस दिनांक ३०.०९.२०२४ रोजी स्पीड पोस्टाद्वारे माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मात्र, आज झालेल्या सुनावणी दरम्यान अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती मिळाली नसल्याचे आयोगासमक्ष कथन केले. याकडे उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे लक्ष वेधले असता, त्यांनी अपिलार्थी यांच्या पत्त्यावर मागितलेल्या माहितीचे दस्ताऐवज पोस्टाद्वारे पाठविल्याचा पुरावा आयोगासमक्ष दाखविला.

ही बाब लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त केली असल्याचा पुरावा प्राप्त झाल्यास त्यांना पुनश्च माहिती देणे अपेक्षीत नाही. जर अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त केली नसेल तर त्यांना पुनश्च नोंदणीकृत डाकेने माहिती पाठवून त्याची पोच आयोगास सादर करावी, या आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढणे अपेक्षीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १५.०६.२०२६**

जावक क्रमांक ५७९६ ------ दिनांक 17 JUL 2026